21-03-2025-Dai-03ff_DH_PAN_20_08_2016-3.qxp 20-03-2025 23:22 Page 1



## निवडक

### वेलकास - सावईवेरे येथे उद्या ‘रितें बॉल्स’ कथा संग्रहाचे प्रकार

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. २०** : वेलकास – सावईवेरे येथील गौरांग बाबुराव भांडीये या उदयोन्मुख युवा लेखकाच्या लेखणीतून साकारलेले ’रितें बॉल्स’ या कथा संग्रहाचा लोकार्पण सोहळा शनिवार दि. २२ रोजी संध्याकाळी ५ वाजता सावईवेरे येथील श्री मदनंत सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून नामवंत समीक्षक प्राचार्य डॉ. राजय पवार उपस्थित राहणार असून गोवा कोंकणी अकादमीचे प्रभारी अध्यक्ष वसंत सावंत अध्यक्षस्थान भूषवतील.याशिवाय युवा साहित्य पुरस्कार प्राप्त कथाकार प्रा. नरेश नाईक उपस्थित राहतील. तरी सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकातर्फे करण्यात आले आहे.

---

### राज्यपालांच्याहस्ते ‘कुंजिकलींचे मुक्तीचे प्रतिध्वनी’चे प्रकाशन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २०** : राज्यपाल पीएस श्रीधरन पिल्लई यांनी राजभवनातील दरबार सभागृहात कुंजिकलीच्या मुक्तीचे प्रतिध्वनी या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन केले. कुंजिकली यांचे ’प्रतिध्वनी मुक्ती’ हे पुस्तक मूळ मल्याळम भाषेतून अनुवादित एका दलित महिलेच्या उठावाची गूढ कथा आहे. हे पुस्तक कुंजिकलीची मनमोहक कहाणी उलगडते, जी निसर्गाच्या चार घटकांना स्वीकारणारी आणि पुक्कैथयूरच्या पौराणिक भूमीत सामाजिक नियमांना आव्हान देणारी एक प्रतिष्ठित दलित महिला होती. या कथेत प्रेम आणि द्वेष, चांगले आणि वाईट या विषयांचा समावेश असून वाचकांना मोहित करते. पुस्तक प्रकाशन समारंभात गोवा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. हरिलाल बी. मेनन आणि पुस्तकाच्या लेखिका प्रा. जयलक्ष्मी आणि प्रकाशक केपीआर नायर उपस्थित होते.गोव्याच्या प्रथम महिला श्रीमती. रीता श्रीधरन पिल्लई यांनीही यावेळी उपस्थिती लावली. पुस्तक प्रकाशन समारंभात बोलताना राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिल्लई यांनी ग्रामीण जीवनावर प्रेम करण्याचा लोकांना सल्ला दिला. स्वातंत्र्यानंतर महात्मा गांधीजींना त्यांच्या गावात परत जायचे होते असे राज्यपालांनी सांगितले. राज्यपालांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी म्हणतात भारत आपल्या खेड्यांमध्ये वसला आहे, असे सांगितले. भारताचे खरे सार आणि शक्ती ग्रामीण समुदायांमध्ये आहे, असेही राज्यपालांनी सांगितले. दलित महिलेच्या भावना जागविणाऱ्या कादंबरीसाठी राज्यपालांनी लेखक आणि प्रकाशकांचे अभिनंदन केले.पुस्तकाच्या लेखिका श्रीमती जयलक्ष्मी यांनी यावेळी बोलताना अनुवादित पुस्तकाची माहिती करून दिली. राज्यपाला पी. एस. श्रीधरन पिल्लई यांच्या कार्याची प्रशंसा केली. सुरवातीस केपीआर नायर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. आर. मिहिर वर्धन आयएएस (निवृत्त) यांनी या प्रसंगी आपले विचार मांडले. पुस्तक प्रकाशन समारंभाला राज्यपालांचे सचिव श्री. एमआरएम राव, आयएएस उपस्थित होते. नंदना रमण यांनी पुस्तकातील एक उतारा वाचून दाखविला. श्रीमती मेघा मुखर्जी यांनी सूत्रसंचालन केले आणि आभार मानले.

---

### बाबलेखळी, सपना पार्कभागात आज, उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २०** : सुमीत माऊंट ट्रान्सफोरमरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शुक्रवार दि. २१ रोजी सकाळी ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत बाबलेखळी, सपना पार्क आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे चेकपोस्ट ट्रान्सफोरमरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शनिवार दि. २२ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत सेंट एन चर्च आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### वीज पुरवठा खंडित

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २०** : ऑईल फॅक्टरी ट्रान्सफोरमरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शनिवार दि. २२ रोजी सकाळी ९ ते संध्या ६ वाजेपर्यंत ऑईल फॅक्टरीच्यामागे, रेल्वे स्टेशनसमोर, ऑईल फॅक्टरी जवळ, स्मारटन्स स्कुल आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे लीली गार्मेंट्स ट्रान्सफोरमरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने रविवार दि. २३ रोजी सकाळी ८ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत पिंपळकट्टा, वसंत भवन, एमडी कॉस्ता, संगीता ज्वेलर्स, बाबू ब्रायडल, बॉम्बे कॅफे, जुनी बँक ऑफ बडोदा, न्यू मार्केट आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### वीज पुरवठा खंडित

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २०** : बटोरा ट्रान्सफोरमरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शनिवार दि. २२ रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत बटोरा भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे कामरशेट ट्रान्सफोरमरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने रविवार दि. २३ रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत कामरशेट भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### हरमल भागात विदेशी पर्यटकांचे योगा, व्यायाम तेजीत,पर्यटक बघ्यांची गर्दी

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २०** : येथील किनारी भागांत पर्यटन हंगामात देशी विदेशी पर्यटकांच्या सायं सत्रात, योगासने व अन्य कसरती होत असल्याने अनेक देशी पर्यटकांना त्याचे अप्रूप वाटत असते. दर दिवशी कित्येक देशी पर्यटक त्यांच्यासोबत सेल्फी घेण्याचा आनंद लुटत असतात तर बघ्या लोकांची गर्दी असते. किनारीभागात संध्याकाळच्या रम्य वातावरणात अनेक मार्गदर्शक देशी योगा ट्रेनर आपल्या शिष्याना घेऊन किनाऱ्यावर उतरत असतात. कित्येक देशी योगा ट्रेनरनी ऑडिओ स्वरूपात रेकॉर्डिंग करून केवळ आसने व अन्य कसरती करण्याचे प्रयत्न केले आहे.काहीजण आसनाची विस्तृत माहिती देऊन त्यांच्याकडून करवून घेत असल्याचे दिसून येते. दरम्यान, योग व व्यायाम शारीरिक दृष्ट्या महत्त्वाचे असल्याने, गोव्याच्या वास्तव्य काळात एक, दीड तास नियमित व्यायाम व आसने करून तंदुरुस्त राहण्याचा प्रयत्न चालू असल्याचे युवती व्हीसोरा जर्मनी यांनी सांगितले. आपणासह या सेशनमध्ये २२ मंडळी असून नियमित हजेरी लावून लाभ घेत असल्याचे त्यांनी सांगितले. टाचा लाभ त्वरित होत नसला,तरी नित्य केल्याने चित्त प्रसन्न होत असते व श्वास संतुलन व सडपातळपणा अंगी भिनत असतो, असे व्हिसोरा यांनी सांगितले. या किनाऱ्यावर एक रशियन पर्यटक नेहमी फ्रीज बिने नेहमी खेळत असतो. वाऱ्याच्या झोत पाहून समुद्रात हवेत उंच फेकून, वाऱ्याबरोबर पुन्हा त्यांच्याकडे येते व पुन्हा पकडुन पुन्हा फेकणे.हा व्यायाम नित्य करीत असल्याचे पाहून अनेक जण  व स्वतः फेकण्याचा प्रयत्न करून आनंद लुटीत असतात.

---

### काँग्रेस अध्यक्षा अलका लाम्बा यांचा गोवा दौरा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २०** : अखिल भारतीय महिला काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती अलका लाम्बा या आपल्या राज्यस्तरीय दौऱ्याच्या अनुषंगाने गोवा दौऱ्यावर आहेत. त्या २१ इन्स्टिट्यूट मेनेझेस ब्रागांझा, पणजी येथे होणाऱ्या गोवा प्रदेश महिला काँग्रेसच्या नवनियुक्त अध्यक्षा डॉ. प्रतीक्षा खलप यांच्या शपथविधी सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत.

श्रीमती अलका लाम्बा यांनी तामिळनाडू, पुद्दुचेरी, राजस्थान, गुजरात आणि अंदमान यांसारख्या विविध राज्यांतील महिला काँग्रेस अध्यक्षांच्या शपथविधी सोहळ्यांमध्ये सहभाग घेतला आहे. आपल्या तीन दिवसीय गोवा दौऱ्यात, त्या सर्व ब्लॉक अध्यक्ष आणि कार्यकारी सदस्यांशी संवाद साधणार असून, २०२७ निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटन बळकट करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करणार आहेत. हा कार्यक्रम महिला नेत्यांच्या सक्षमीकरणाचा तसेच महिला काँग्रेसच्या समावेशक राजकीय सहभागाच्या वचनबद्धतेचा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

# गोव्यात ई-स्टॅम्पिंग सुरु

## प्रशासकीय कारभाराचे डिजिटायझेशन | मुख्यमंत्र्यांच्या हस्ते योजनेचे उद्घाटन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २०** : गोवा सरकारने कागदपत्रांचे सुरक्षित इलेक्ट्रॉनिक स्टॅम्पिंग आणि ९ हजार ९९९ पेक्षा जास्त किमतीच्या स्टॅम्प ड्युटीच्या डिजिटायझेशनसाठी गुरुवारपासून ई-स्टॅम्पिंग सुविधा सुरू केली. महसूल मंत्री अतानासियो मोन्सेरात यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी मंत्रालयात या योजनेचे उद्घाटन केले.

भारतीय स्टॉकहोल्डिंग कॉर्पोरेशनला या उपक्रमासाठी केंद्रीय रेकॉर्ड एजन्सी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. मुख्यमंत्री सावंत यांनी या निर्णयाला राज्यातील प्रशासन आणि सार्वजनिक सेवा वितरणाच्या आधुनिकीकरणासाठी एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे म्हटले आहे. स्टॅम्प ड्युटी प्रणालीमध्ये डिजिटली सक्षम, कार्यक्षम आणि पारदर्शक प्रणालीच्या दिशेने हा एक ऐतिहासिक टप्पा असल्याचे मुख्यमंत्री सावंत यांनी यावेळी सांगितले

या उपक्रमामध्ये २४ तास स्टॅम्प ड्युटी पेमेंट सुविधा, कागदविरहित आणि त्वरित पडताळणीसह व्यवहार, फसव्या व्यवहारांचे उच्चाटन आणि महसूल तोटा रोखण्यासाठी अचूक पेमेंट प्रणाली आणि सर्व स्टॅम्प पेपर विक्रेत्यांना विश्वासात घेण्याची हमी इत्यादी महत्वाच्या गोष्टींचा समावेश आहे.

ई-स्टॅम्पिंग सुरू करण्याच्या वेळी माझगाव डॉक शिपबिल्डिंग लिमिटेड आणि गोवा राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्यात एक महत्त्वाचा सामंजस्य करार करण्यात आला. या कराराद्वारे गोव्यातील आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रगत उपकरणे, प्रणाली आणि पायाभूत सुविधांचा समावेश करण्यात येणार आहे. प्रगत तंत्रज्ञानाचे हे एकत्रीकरण समन्वय वाढवेल आणि जीवित व मालमत्तेचे नुकसान कमी करण्यास मदत करेल. गोवा आता एआय-चालित आपत्ती व्यवस्थापन प्रणालीकडे वाटचाल करत आहे, असे मुख्यमंत्री सावंत म्हणाले.

मुख्यमंत्री सावंत यांनी विकसित गोवा २०४७ प्रकल्पाचीही घोषणा केली. या प्रकल्पाचा उद्देश राज्याच्या दीर्घकालीन विकास दृष्टिकोनाला आकार देणे आहे. राज्य मंत्रिमंडळाने या प्रकल्पास मंजुरी दिली असून, कॉर्पोरेट चाणक्य सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड या प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून कार्य करणार आहे. अंतिम व्हिजन डॉक्युमेंटमध्ये समाविष्ट करण्यासाठी सरकार जनतेच्या सूचना घेणार आहे, असे सावंत यांनी सांगितले. राज्य मंत्रिमंडळाने वीज विभागाकडून डिझाइन, बिल्ड, फायनान्स, ओन, ऑपरेट आणि ट्रान्सफर तत्त्वावर स्मार्ट प्रीपेड मीटरिंग सुरू करण्यास मान्यता दिली आहे. या योजनेसाठी डीजी स्मार्ट प्रायव्हेट लिमिटेड यांना कंत्राट देण्यात आले आहे.

प्रारंभी ही सेवा केवळ व्यावसायिक आणि तीन-फेज कनेक्शन असलेल्या ग्राहकांसाठी लागू करण्यात येणार आहे. घरगुती ग्राहकांना ही सुविधा लागू केली जाणार नाही, असे मुख्यमंत्री सावंत यांनी स्पष्ट केले.

# पिळर्ण दरोडाप्रकरणी पाच जणांना अटक

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २०** : पिळर्ण येथे चाकूच्या धाकावर २४ लाख रुपयांच्या दरोड्याच्या प्रकरणी पर्वरी पोलिसांनी एका स्थानिक महिलेसह पाच जणांना अटक केली आहे. ओळख प्रिया डिसूझा उर्फ जॉयसी (३२), कल्पना बर्की (३७), इम्रान शेख (३४, पुणे), सुभाष कुमार (२७, उत्तर प्रदेश) आणि धीरज गुप्ता (२०, कोलवाले) अशी अटक केलेल्या आरोपींची  नावे आहेत .

पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, तक्रारदाराची शेजारीण असलेल्या प्रिया डिसूझा हिला तक्रारदाराकडे मोठ्या प्रमाणात रोख रक्कम आणि सोन्याची माहिती होती. त्यामुळे तिने आपल्या मित्रांसह दरोड्याचा कट रचला होता.

प्रिया उर्फ जॉयसीने कृष्णा बेळगावकर आणि कल्पना बर्की यांच्या मदतीने गुन्ह्याची योजना आखली. कृष्णाने उर्वरित आरोपींची व्यवस्था केली, तर कल्पना बर्कीने तिच्या मित्र इम्रान शेखच्या मदतीने गुन्ह्यासाठी वाहनाची व्यवस्था केली. गुन्हा केल्यानंतर चोरीला गेलेले सोने आणि रोख रक्कम कळंगुट येथील एका हॉटेलमध्ये आरोपींमध्ये वाटण्यात आले.

तपासादरम्यान पोलिसांनी उघड केले की, प्रिया डिसूझा हिच्यावर यापूर्वीही विविध गुन्ह्यांप्रकरणी पर्वरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. कृष्णा बेळगावकर हिचा २०१८ मध्ये कळंगुट येथे झालेल्या खून प्रकरणात सहभाग होता आणि सध्या ती जामिनावर आहे. तसेच, कल्पना बर्की हिच्यावर २०१८ मध्ये कुडचडे येथे तिच्या पतीच्या हत्येप्रकरणी गुन्हा दाखल आहे.

पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेला चाकू, दरवाजा तोडण्यासाठी वापरलेला लोखंडी रॉड आणि गुन्ह्यासाठी वापरण्यात आलेले वाहन जप्त केले आहे. तसेच चोरीला गेलेल्या मालाचा काही भागही हस्तगत करण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणातील आणखी तीन संशयितांची ओळख पटली असून, त्यांचा शोध घेण्यासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत. तपास अधिक गतीने सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# गोवा विद्यापीठातील पेपरफुटी प्रकरणाची चौकशीसाठी उच्चस्तरीय समिती

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २० :** गोवा विद्यापीठातील कथित पेपरफुटी प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सरकारने चार सदस्यीय उच्चस्तरीय समितीची स्थापना केली आहे. माजी न्यायमूर्ती आर.एम.एस. खांडेपारकर यांच्या अध्यक्षतेखालील या समितीत माजी डीआयजी बॉस्को जॉर्ज (निवृत्त आयपीएस), गोवा विद्यापीठाच्या माजी कुलसचिव डॉ. राधिका नायक आणि व्ही.एम. साळगावकर लॉ कॉलेजचे प्राध्यापक प्रा. एम.आर.के. प्रसाद यांचा समावेश आहे.

समितीला लवकरात लवकर अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. उच्च शिक्षण संचालनालय समितीला आवश्यक सचिवीय सहकार्य पुरवेल, तसेच गोवा विद्यापीठ समितीच्या कार्यालयासाठी आणि बैठकींसाठी सुसज्ज जागा उपलब्ध करून देईल, असे आदेश उच्च शिक्षण विभागाचे अवर सचिव यशस्वी शेट्ये यांनी दिले आहेत.

यापूर्वी, विद्यापीठाने दोन सदस्यीय तथ्य शोध समिती स्थापन केली होती. या समितीने बुधवारी अहवाल राज्यपाल आणि विद्यापीठाचे कुलपती पी.एस. श्रीधरन पिल्लई यांना सादर केला. पोलिसांच्या दोन तक्रारींनंतर १७ मार्च रोजी स्थापन करण्यात आलेल्या या समितीला ४८ तासांच्या आत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

दरम्यान, विद्यापीठाने एका विद्यार्थिनीला परीक्षेचा पेपर लीक केल्याच्या आरोपावरून भौतिक आणि उपयोजित विज्ञान शाळेतील सहाय्यक प्राध्यापक डॉ. प्रणव नाईक यांना चौकशी पूर्ण होईपर्यंत निलंबित केले आहे. तथापि, विद्यापीठाने पेपरफुटीबाबत कोणतीही अधिकृत तक्रार नोंदवली नसल्याचे स्पष्ट केले आहे.

# आगोंद किनाऱ्यावरील बेकायदेशीर आस्थापनांवर कारवाई सुरू

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. २० :** उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आगोंद समुद्रकिनाऱ्यावर बेकायदेशीरपणे उभारण्यात आलेल्या ६७ आस्थापनांवर कारवाईस २० रोजी सकाळी ११ वाजता सुरुवात झाली. आतापर्यंत एकूण २४ आस्थापनांना टाळे ठोकण्यात आले असून, उर्वरित आस्थापनांवर २१ रोजी कारवाई होणार आहे.

उपजिल्हाधिकारी मधू नार्वेकर यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. त्यांच्यासोबत मामलेदार मनोज कोरगावकर, वीज विभागाचे अभियंता आणि कर्मचारी, पाणी पुरवठा विभागाचे अभियंता व कर्मचारी, पंचायत सचिव अमोल नाईक गावकर आणि स्थानिक पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.




कारवाई दरम्यान, वीज विभागाने आस्थापनांची वीज जोडणी तोडली, तर पाणी पुरवठा विभागाने पाणीपुरवठा खंडित केला. आदेशाची प्रत चिकटवून आस्थापनांना टाळे ठोकण्यात आले. काही आस्थापनांचे मालक स्वतःहून आस्थापनातील सामान बाहेर काढताना दिसले. विशेष म्हणजे कारवाईदरम्यान कोणत्याही प्रकारचा विरोध करण्यात आला नाही.उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने कासव संवर्धन मोहिमेला अडथळा निर्माण करणाऱ्या बेकायदेशीर आस्थापनांवर कारवाईचे आदेश दिले होते. न्यायालयाने २४ तासांच्या आत आस्थापनांवर टाळे ठोकण्याचे निर्देश उपजिल्हाधिकारी मधू नार्वेकर यांना दिले होते.

ही कारवाई शांततेत आणि कोणताही अनुचित प्रकार घडू न देता पार पडली, असे उपजिल्हाधिकारी मधू नार्वेकर यांनी स्पष्ट केले.

# ओल्ड गोव्यातील ७६ बेकायदेशीर बांधकामांवर जलद निर्णय घेण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २० :** मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने ओल्ड गोवा गाव पंचायतीला ७६ बेकायदेशीर बांधकामांवर बजावलेल्या कारणे दाखवा नोटिसांबाबत ३० मेपर्यंत जलद आणि अद्ययावत निर्णय घेण्याचे आदेश दिले आहेत.

जॉन बॅप्टिस्टा मस्कारेनहास यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेच्या सुनावणीदरम्यान पंचायतीने न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करताना नमूद केले की, २५ नोव्हेंबर २०२४ रोजी ७६ अनधिकृत बांधकामे करणाऱ्या व्यक्तींना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. पंचायतीने याबाबत प्रतिक्रिया घेण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगत ३० मे २०२५ पर्यंत संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होईल, असे आश्वासन दिले आहे.

याचिकाकर्त्याचे वकील ॲड. पराग वागळे यांनी सांगितले की, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने सेंट फ्रान्सिस झेवियरच्या अवशेषांच्या प्रदर्शनादरम्यान अधीक्षक पुरातत्वशास्त्रज्ञांना सशर्त मान्यता दिली होती. तथापि, विविध उल्लंघनांच्या पार्श्वभूमीवर याचिकाकर्त्याने १६ जानेवारी २०२५ रोजी अधिकाऱ्यांना निवेदन दिले होते.

केंद्र सरकारचे स्थायी वकील, सांस्कृतिक मंत्रालय, पुरातत्व विभाग, नवी दिल्ली, तसेच एएसआयचे संवर्धन सहाय्यक आणि अधीक्षक पुरातत्वशास्त्रज्ञ यांनी न्यायालयासमोर आपली भूमिका मांडण्यासाठी वेळ मागितला. ॲड. आर. चोडणकर यांनी सांगितले की, ११ नोव्हेंबर २०२४ रोजी तिसवाडी तालुका मामलतदारांनी जारी केलेल्या आदेशानुसार संबंधित यंत्रणांकडून पुढील सूचना अपेक्षित आहेत.

तिसवाडी मामलतदारांनी केलेल्या सर्वेक्षणात जुन्या गोव्यातील प्रतिबंधित क्षेत्रामध्ये ५४ अनधिकृत बांधकामे आढळली होती. या बेकायदेशीर बांधकामांमध्ये माजी मंत्री पांडुरंग मडकईकर, ओल्ड गोवा गाव पंचायतीचे माजी सरपंच आणि गोवा राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ यांचा समावेश असल्याचे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

याचिकाकर्त्यांच्या मते, प्रतिबंधित क्षेत्रामध्ये अनधिकृत बांधकामे आणि व्यावसायिक वापरामुळे स्मारकांच्या परिसरात कचरा आणि अस्वच्छतेचा धोका निर्माण झाला आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी स्मारकांचे संरक्षण, जतन आणि संवर्धन करण्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी केला आहे.

याचिकाकर्त्यांनी न्यायालयाकडे ज्या मागण्या केल्या आहेत त्यामध्ये प्रतिबंधित क्षेत्रातील सर्व बेकायदेशीर बांधकामांवर तत्काळ कारवाई करावी, जमीन तिच्या मूळ स्थितीत आणण्याचे निर्देश द्यावेत आणि प्राचीन स्मारकांच्या संरक्षणासाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात या प्रमुख मागण्या आहेत. हे प्रकरण आता १७ जून २०२५ रोजी पुढील सुनावणीसाठी निश्चित करण्यात आले आहे.

# शाळा १ एप्रिलपासूनच सुरू होणार : मुख्यमंत्री

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २० :** शिक्षण विभागाने निश्चित केलेल्या तारखेनुसार राज्यातील शाळा १ एप्रिलपासून सुरु होतील, अशी माहिती मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी गुरुवारी दिली. शिक्षण विभागाने ठरवलेल्या तारखेनुसार शाळा पुन्हा सुरु होतील, असे सावंत यांनी पर्वरी येथे मंत्रालयात पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले.

शिक्षण संचालनालयाने जाहीर केले आहे की, २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता ६ वी ते १० वी आणि इयत्ता १२ वी साठी सर्व सरकारी, अनुदानित आणि विनाअनुदानित मान्यताप्राप्त शाळा १ एप्रिलपासून सुरु होणार आहेत.  शिक्षण संचालक शैलेश झिंगडे यांनी जारी केलेल्या परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे की, एप्रिल महिन्यात शालेय वर्ग सकाळी ११.३० वाजेपर्यंत चालणार आहेत. त्यानंतर १ मे ते ३ जून या कालावधीत उन्हाळी सुट्टी असेल. शाळा नियमित वेळेनुसार ४ जून २०२५ पासून पुन्हा सुरु होतील.

दरम्यान, शाळा एप्रिलपासून सुरु करण्याच्या निर्णयाला राज्यभरातून पालकांचा तीव्र विरोध होत आहे. संतप्त पालकांनी अलीकडेच शिक्षण संचालनालयाबाहेर निदर्शने करत सरकारवर केंद्राचा आदेश लादत असल्याचा आरोप केला. त्यांनी १ एप्रिलपासून शाळा सुरु करण्याचा निर्णय तात्काळ मागे घेण्याची मागणी केली आहे. पालकांच्या गटाने यासंबंधी गोवा येथील मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली आहे. याचिकेत शिक्षण विभागाने कोणतीही पूर्वसल्लामसलत किंवा वादविवाद न करता हा निर्णय घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे.  पालकांच्या आक्षेपाची दखल घेत गोवा येथील मुंबई उच्च न्यायालयाने केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि गोवा सरकारला नोटीस बजावली आहे.  लवकरच सुनावणी होणार आहे.

# आगोंदनंतर मोरजी, आश्वे, मांद्रेतील शॅक व्यवसायिकांमध्ये चिंता

## शॅक व्यावसायिकांमध्ये चिंता | त्वरित कारवाई करण्याची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २० :** आगोंद किनाऱ्यावर कासव संवर्धन मोहीम यशस्वी करण्याच्या दृष्टीने उच्च न्यायालयाने काही शॅक, रेस्टॉरंट बंद करण्याचे आदेश दिल्यानंतर मोरजी, आश्वे आणि मांद्रे किनारी भागातील शॅक व्यावसायिकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे.

आगोंद समुद्रकिनारी दरवर्षी मोठ्या संख्येने सागरी कासव येऊन अंडी घालतात. त्याच धर्तीवर पेडणे तालुक्यातील मोरजी, आश्वे आणि मांद्रे किनाऱ्यावरही हजारो कासवांनी आतापर्यंत लाखो अंडी घालून हजारो पिल्लांना समुद्रात यशस्वीरित्या सोडण्यात आले आहे. वनविभाग आणि वनखात्याने ही प्रक्रिया सातत्याने राबवली आहे.



मात्र, काही खाजगी जमिनींवरील शॅक रेस्टॉरंट आणि रिसॉर्टमधून होणाऱ्या ध्वनी प्रदूषण आणि विजेच्या झगमगाटामुळे कासव संवर्धन मोहिमेला अडथळा येत असल्याचे वनखात्याचे म्हणणे आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर मोरजी, आश्वे आणि मांद्रे किनारी भागातील खाजगी जमिनीवरील रिसॉर्ट आणि शॅक व्यवसायिकांवरही कारवाई होणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. प्रत्येक पर्यटन हंगामात सरकारकडून मोरजी, आश्वे आणि मांद्रे किनाऱ्यावर सरकारी जमिनींवर सेक व्यवसायासाठी परवाने दिले जातात. मात्र, सरकारी परवानाधारक शॅक व्यावसायिक रात्री विजेच्या मर्यादित सुविधांमध्ये व्यवसाय करत असतात. दुसरीकडे, खाजगी जमिनीवरील शॅक व्यवसायिकांकडून मात्र विद्युत रोषणाई आणि पार्ट्यांमुळे ध्वनी प्रदूषण मोठ्या प्रमाणात होत असल्याची तक्रार आहे.

वनखात्याच्या अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, गेल्या दोन वर्षांत ध्वनी प्रदूषण असूनही मोठ्या संख्येने कासवांनी अंडी घातली आहेत. गेल्या वर्षी १३२ कासवांनी अंडी घातली होती. यंदाच्या हंगामात मार्चपर्यंत १५२ कासवांनी अंडी घातली असून हा आकडा २०० च्या पार जाण्याची शक्यता आहे.

उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर मोरजी, आश्वे आणि मांद्रे किनारी भागातील शॅक रेस्टॉरंट आणि रिसॉर्टवर कारवाई होणार का, याबाबत सोशल मीडियावर चर्चा रंगली आहे. काणकोण किनारी भागातील रिसॉर्टवर न्यायालयाने कारवाईचे आदेश दिल्यानंतर मोरजी आणि मांद्रे किनाऱ्यावरही अशाच प्रकारच्या कारवाईची शक्यता आहे. स्थानिक रहिवाशांनी सरकारला खाजगी जमिनीतील शॅक व्यवसायावर नियंत्रण ठेवण्याची मागणी केली आहे. तसेच, ध्वनी प्रदूषण आणि विजेच्या झगमगाटावर त्वरित कारवाई करण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे.